प्रेसनोट दि. ०५.०७.२०२१

श्री. मयुर जयवंत साळुंखे वय ४३ वर्ष प्रधान तंत्रज्ञ, दक्षिण उप विभाग म.रा.वि.वि. कं मर्या शहर विभाग सांगली रा. एम.एस.ई.बी निवास्थान, विश्रामबाग सांगली मुळ रा. नांद्रे ता. मिरज जि. सांगली यांना ५,५००/- रूपये लाच स्विकारताना पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे राहते जागेमध्ये असलेले विद्युत पोल काढून देण्यासाठी श्री.साळुंखे, लायनमन यांनी १६०००/- रूपये लाचेची मागणी करुन त्यापैकी १०,०००/- रुपये प्रथम स्विकारुन उर्वरीत ६०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०५.०७.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ०५.०७.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे राहते जागेमध्ये असलेले विद्युत पोल काढून देण्यासाठी श्री. साळुंखे लायनमन यांनी तक्रारदार यांचेकडे ६०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती ५,५००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचे राहते घराजवळ विद्युत पोल काढण्याचे काम सुरू असले ठिकाणी सापळा लावला असता श्री. मयुर जयवंत साळुंखे वय ४३ वर्ष प्रधान तंत्रज्ञ, दक्षिण उप विभाग म.रा.वि.वि. कं मर्या शहर विभाग सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ५,५००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. मयुर जयवंत साळुंखे वय ४३ वर्ष प्रधान तंत्रज्ञ, दक्षिण उप विभाग म.रा.वि.वि. कं मर्या शहर विभाग सांगली रा. एम.एस.ई.बी निवास्थान, विश्रामबाग सांगली मुळ रा. नांद्रे ता. मिरज जि. सांगली यांचे विरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार धनंजय खाडे, संजय कलगुटगी, अविनाश सागर, प्रितम चौगुले, भास्कर भोरे, रविंद्र धुमाळ, सलिम मकानदार, सिमा माने, राधिका माने, श्रीपती देशपांडे, विना जाधव, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner